**नियमित दिवाणी दावा क्र.४३/२०१९**
**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१९७–२०१९**

**निशाणी क्र.१४६ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, सदरील दावा वादीने प्रतिवादी विरुध्द शाखावार वाटपासाठी दाखल केला आहे. तरी सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.९ श्रीमती मनीषा मनोहर आलव या दि.०६/०९/२०२५ रोजी गाव मौजे तिर्लोट येथे मयत झाल्या आहेत. तिला पती, मुलगा अगर मुलगी असे कुणीही वारस नाहीत. सबब, प्रतिवादी क्र.९ हिचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

५. सदर कामी नि.क्र.१४८ सोबत दाखल केलेले मयत प्रतिवादी क्र.९ श्रीमती मनीषा मनोहर आलव यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.९ श्रीमती मनीषा मनोहर आलव या दि.०६/०९/२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. वादी यांनी त्यांच्या अर्जात केलेली मागणी तांत्रिक स्वरुपाची आहे. प्रस्तुत मागणी केल्यास दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. याउलट प्रस्तुत दाव्याचा न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.१४६ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.01.14 15:45:51 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )

दिनांकः १४/०१/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड